# सूचना पाळणे

तंतोतंत पाळता येतील अशा अचूक सूचना तुम्ही चांगल्या प्रकारे देऊ शकता का? मध्यभागी एक पडदा लावलेल्या टेबलाच्या दोन बाजूंना दोन खेळाडू बसतात. दोघांकडे त्याच वस्तू आहेत. त्यातील मुलगी तिच्याकडच्या वस्तू एका बिशिष्ट क्रमाने एका पद्धतीने मांडते. ती काय करत आहे हे ती आपल्या भिडूला सांगते.



त्याला ती दिसत नाही, पण ती सांगेल त्याप्रमाणेच करत राहून त्याला तिच्यासारखीच मांडणी करायची आहे. हे बहुतेक वेळा वाटते तितके सोपे नसते. यात केवढा गोंधळ होतो हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल!